# लोकमान्य टिळकांच्या राजकीय चतुसूत्री विचारांची प्रासंगिकता

**डॉ. योगीराज. एस .उरकुडे**
राज्यशास्त्र विभाग
भगवंतराव कला महाविद्यालय,
सिरोंचा.

---

ज्यांनी आपल्या असामान्य कार्यकर्तृत्वाने आणि आयुष्यभराच्या देशसेवेने भारताच्या भावी स्वातंत्र्याचा पाया घातला अशा महान नेत्यांमध्ये अग्रणी नेते म्हणजे बाळ गंगाधर टिळक होय. लोकमान्य टिळकांना वगळून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही.

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच अशी घोषणा करून ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय जनतेमध्ये असंतोष निर्माण करणारे असंतोषाचे जनक म्हणून लोकमान्य टिळकांना ओळखले जाते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म 23 जुलै 1856 ला रत्नागिरी जिल्ह्यात झाला त्यांचे वडील शिक्षक होते टिळकांची स्मरणशक्ती असामान्य होती 1877 मध्ये ते बीए झाले त्यानंतर त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले आणि एल एल बी ची परीक्षा पास झाल्यानंतर देश सेवेला प्रारंभ केला शिक्षणाशिवाय भारतीयांचा उद्धार होणार नाही याची त्यांना जाणीव होती शाळा कॉलेजच्या बाहेर असणाऱ्या लाखो देशबांधवांना सुशिक्षित करण्यासाठी त्यांनी केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. लोकांमध्ये स्वाभिमान लोकसेवा स्वावलंबन इत्यादी गुण वाढावे यासाठी त्यांनी लेखन केले वृत्तपत्रातील त्यांच्या सत्य व निर्भीड विचारांमुळे त्यांच्यावर अनेक वेळा देशद्रोहाचे खटले भरण्यात आले व त्यांना तुरुंगात पाठविण्यात आले जनतेत राजकीय जागृती निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला शिक्षण आणि वृत्तपत्र यासोबतच गणेशउत्सव व शिवजयंती उत्सव सार्वजनिक पणे साजरे केले त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये चैतन्य निर्माण केले त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून जन्मठेपेची शिक्षा दिली ती शिक्षा त्यांनी ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात भोगली शिक्षा भोगत असतानाच त्यांनी तुरुंगातच गीतारहस्य नावाचा अजरामर ग्रंथ लिहिला. लोकमान्य टिळकांची त्यागी वृत्ती नैतिकता चारित्र्य समाजसेवा प्रचंड आशावाद या त्यांच्यामधील गुणयुक्त गोष्टी पाहून जनतेने त्यांना लोकमान्य ही पदवी बहाल केली अशा थोर भारतीय नेत्याचे आणि विचारवंताचे एक ऑगस्ट 1920 ला निधन झाले .

## टिळकांची राजकारणाची चतुसूत्री :-

भारतीय जनतेला स्वराज्य हवे होते परंतु हे स्वराज्याचे ध्येय कसे साध्य करावे यावरून त्यावेळच्या पुढाऱ्यात मतभेद होते त्यातून जहाल व मवाळ असे दोन गट निर्माण झाले. मवाळ गटाला घटनात्मक मार्गाचा अवलंब करून स्वराज्य पाहिजे होते तर टिळकांचे मत असे होते की भारताला घटनाच नाही भारतातील ब्रिटिश सरकार भारतीय जनतेला जबाबदार नाही त्यामुळे घटनात्मक मार्गाचा अवलंब करणे चूक आहे परंतु याचा अर्थ असा नाही की लोकमान्य टिळकांनी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सरकारचे लक्ष

भारतीय जनतेकडे आकर्षित करण्यासाठी त्यांनी निश्चित असा कार्यक्रम जनतेसमोर ठेवला त्यालाच टिळकांची राजकारणाची चतुसूत्री असे म्हणतात. ती पुढील प्रमाणे

**१) बहिष्कार :-** ब्रिटिश भारतात आले आणि त्यांना भारताची फार मोठी बाजारपेठ मिळाली. इंग्लंडमधून या देशात परकीय माल विक्रीसाठी येत होता भारतातील करोडो रुपये परकीय मालावर खर्च होत होते परदेशी मालावर बहिष्कार टाकून ब्रिटिश अर्थव्यवस्था मोडकळीस आणण्याचा ब्रिटिश अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचा टिळकांचा या बहिष्कार मागे उद्देश होता. त्यासाठी त्याग, धैर्य आवश्यक आहे .बहिष्कार हे फार प्रभावी असे अस्त्र आहे त्यामुळे दुहेरी फायदा होणार होता. परदेशात जाणारा पैसा वाचत होता आणि देशातील उद्योगधंदे वाढणार होते आजही भारताला जगात विकसित आणि संपन्न राष्ट्र बनवायचे असेल तर भारतीय जनतेने परकीय मालावर बहिष्कार टाकने आवश्यक आहे. ज्यामुळे या देशात बंद पडलेले उद्योगधंदे पुन्हा सुरू होतील आणि भारतातील पैसा भारतातच राहील. जनतेला रोजगार मिळेल बेरोजगारी दूर होईल. टिळक म्हणतात तुमच्यात सशस्त्र क्रांती करण्याची शक्ती नसेल तरी चालेल पण तुमच्यात आत्महत्या आणि आत्मसंयम ही शक्ती असेल तर ब्रिटिश तुमच्यावर शासन करू शकणार नाही. बहिष्कार म्हणजे बहिष्कार म्हणजे ब्रिटिशांना कोणत्याच प्रकारचे सहकार्य न करणे. कर वसुली, सैन्य, शांतता, युद्ध ,नोकरी अशा कोणत्याही बाबतीत ब्रिटिशांना सहकार्य करू नये.असे टिळकांचे मत होते.

**२) स्वदेशी :-** लोकमान्य टिळकांनी बहिष्काराची चळवळ सुरू केल्यानंतर भारतात जागोजागी परकीय मालाची होळी करण्यात आली पण फक्त परकीय मालाची होळी करून चालणार नाही तर भारतात तयार झालेला माल वापरण्यास सुरुवात करणे आवश्यक आहे. स्वदेशीच्या चळवळी मागे स्वदेश प्रेम आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश होता .त्याचबरोबर बंद पडलेले उद्योग धंदे पुन्हा सुरू होणार होते स्वदेशीची चळवळ ही बहिष्काराला पूरक होती .या दोन्ही चळवळीने भारतात जोर धरला .ब्रिटिश सरकारला योग्य मार्गावर आणण्याचा तोच एक मार्ग होता टिळक फक्त उपदेश करत राहिले नाही तर ते प्रत्येक गोष्ट स्वतः आचरणात आणत .फक्त विचारानेच नाही तर मनानेही स्वदेशी असावे असे ते सांगतात.

**३) राष्ट्रीय शिक्षण :-** राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व टिळकांनी जाणले होते राष्ट्रीय शिक्षण म्हणजे ज्या शिक्षणामुळे विद्यार्थ्याला राष्ट्राची माहिती मिळते ते शिक्षण म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होय. ब्रिटिशांच्या काळात शाळा व कॉलेज खूप होती पण त्यावर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण होते .त्या शिक्षणात देशाची संस्कृती व देशप्रेम यांना कोणतेही स्थान नव्हते. भारतीय जीवनाशी ती पद्धती सुसंगत नव्हती देशप्रेम स्वातंत्र्य आणि देशाची संस्कृती यांना काहीच स्थान नव्हते .ब्रिटिशांनी सुरू केलेले शिक्षण म्हणजे कारकून निर्माण करणारे कारखाने होते. टिळकांनी देशभर राष्ट्रीय शाळा निर्माण करण्याची योजना आखली भारतीय जीवन आणि भारतीय विचार यांच्याशी टिळकांचे शिक्षण सुसंगत राहणार होते.

**४) स्वराज्य :-** स्वराज्याचा अर्थ स्वातंत्र्य किंवा परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून मुक्ती असा करण्यात येतो पण स्वराज्याचा एवढाच अर्थ टिळकांना अभिप्रेत नव्हता. टिळकांची स्वराज्याची कल्पना व्यापक आहे. स्वराज्याची कल्पना धर्माला अनुसरून आहे. स्वराज्याशिवाय कोणतीही व्यक्ती धर्माचे आचरण करू शकत नाही. स्वराज्याशिवाय स्वधर्म नाही आणि स्वधर्माशिवाय स्वतंत्र जीवन नाही. त्यामुळेच प्रथम स्वराज्य मिळाले पाहिजे

Research Hub International Journal

असे टिळकांचे विचार होते .कोणताही समाज राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करेल तेव्हाच तो स्वातंत्र्याचा उपभोग घेईल .समाजाची प्रगती सामाजिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्यावर अवलंबून असते ब्रिटिश भारतात आले ते भारतीयांच्या कल्याणासाठी नाही तर त्यांच्या स्वार्थासाठी. स्वराज्याचा अर्थ सांगताना टिळक म्हणतात इंग्रजांना इंग्लंडमध्ये जे स्थान आहे ते स्थान भारतीयांना भारतात मिळालेच पाहिजे म्हणजेच स्वराज्य होय.

अशाप्रकारे टिळकांनी राजकारणाची चतुसूत्री सांगितली आहे.

**संदर्भग्रंथ**


- प्रा.रा.ज लोटे "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स ,नागपूर.
- २)प्रा. अरविंद शृंगारपुरे, "भारतीय राजकीय विचार", श्री मंगेश प्रकाशन ,नागपूर.
- डॉ. भा. ल.भोळे, "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे प्रकाशन ,नागपूर


Research Hub International Journal